# प्रसिद्धिपत्रक

पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,
बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ, पुणे-४११००६
फोन नं. ०२०-२६६८५०००


जा.क्र./पोउआ/वाह/ १२७४ /२०२५ पुणे दिनांक -१३/ ०२ /२०२५

पुणे शहरातील शिवाजीनगर वाहतूक विभागांतर्गत दिनांक १५.०२.२०२५ रोजी पोलीस मुख्यालय,शिवाजीनगर पुणे या ठिकाणी '' **तरंग -२०२५** '' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असुन सदर कार्यक्रमासाठी मा.व्हि.व्हि.आय.पी व इतर मान्यवर उपस्थित राहणार असल्याने सिमला चौक ते वीर चाफेकर चौक दरम्यान वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणे करीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी अमोल झेंडे, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक शाखा, पुणे शहर, शिवाजीनगर वाहतुक विभागातील खालील नमुद रस्त्यावर तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

**<u>शिवाजीनगर वाहतुक विभाग पुणे अंतर्गत दि. १५/०२/२०२५ रोजी दुपारी१६.०० वा. ते २४.०० वा. चे दरम्यान खालील प्रमाणे वाहतुकीत बदल करण्यात येत आहेत.</u>**

➢ **सिमला चौकातुन हार्डीकर पेट्रोल पंपा कडुन वीर चाफेकर चौकाकडे जाणारा रस्ता सर्व प्रकारचे वाहनाकरीता बंद करण्यात येत आहे.**

**पर्यायी मार्ग -**

**सिमला चौक-प्राईड हॉटेल समोरून-वीर चाफेकर ओव्हर ब्रीज-सुर्यमुखी चौक येथुन पुढे इच्छित स्थळी जातील.**

(नागरीकांनी वरील मार्गाचा वापर करावा तसेच वाहतुक कर्मचारी / स्वयंसेवक यांना सहकार्य करावे. )

पोलीस उप-आयुक्त, वाहतूक, पुणे शहर

( अमोल झेंडे )
पोलीस उप-आयुक्त
वाहतूक पुणे शहर

**प्रति,**

१) **जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,** नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१
२/- सदरची प्रेसनोट सर्व वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्याची विनंती आहे.

**प्रत :- २)सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक-१/२/३/४** , पुणे शहर.

३)**पोलीस निरिक्षक, प्रेसरूम,** पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
२/- सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

४) **प्रभारी अधिकारी शिवाजीनगर** वाहतुक विभाग, पुणे शहर.
२/- **सदर प्रेसनोटच्या प्रती संबंधित दुकानदार / प्रतिष्ठीत व स्थानिक नागरिक यांना तात्काळ अदा करून, त्यांची स्वाक्षरी घेण्यात यावी तसेच अंतिम प्रेसनोट सादर करावी.**

५) **पोलीस उप निरीक्षक, मल्टीमिडीया कक्ष, वाहतूक शाखा, पुणे शहर**
२/- सदर प्रेसनोट ही पुणे वाहतुक पोलीस वेबसाईट व फेसबुकवर / व्टिटरवर अपलोड करावी. सदरची प्रेसनोट कोणत्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली आहे, त्या वर्तमानपत्राचे कात्रणाची छायांकित प्रत इकडील कार्यालयात सादर करावी.

६) **पोलीस निरीक्षक, नियोजन, वाहतूक शाखा, पुणे शहर**
२/- संबंधित विभागांचे प्रभारी अधिकारी यांचेकडून पुर्तता अहवाल प्राप्त करुन घेऊन सादर करावा.